Shiv Chhatrapati Shikshan Sanstha's

# Rajarshi Shahu Mahavidyalaya, Latur (Autonomous)

## Department of MARATHI

A) SUMMARY REPORT

| | | | | |
|---|---|---|---|---|
| 1) Title of Programme: | | राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)<br>मराठी संशोधन केंद्र आयोजित<br>प्रकट मुलाखत<br>**डॉ. साहेब खंदारे**<br>**विषय: अमूर्त संस्कृती संचित**<br>मुलाखतकार डॉ. संभाजी पाटील, डॉ. गणेश बेळंबे, कवी राजेसाहेब कदम | | |
| 2) Name of Organizing Department/Unit: | | मराठी | | |
| 3) Name of the Coordinator | | डॉ. संभाजी पाटील | | |
| 4) Date(s) of the Programme: | | १३ सप्टेंबर २०२४ | | |
| 5) Venue: | | व्हीएलसी हॉल | | |
| 6) Target Group: | | पदवीचे विद्यार्थी | | |
| 7) Number of Participants: | | Male | Female | Total |
| A separate list with signatures be maintained in the department/Unit) | Teaching | ०६ | ०० | ०६ |
| | Non-Teaching | ०० | ०० | ०० |
| | Students | ११ | ३५ | ४६ |
| | **एकूण** | १७ | ३५ | ५२ |
| 8) Name(s) and details of Resource Person(s), if any: | | **डॉ. साहेब खंदारे**<br>लोकसाहित्याचे अभ्यासक, संशोधक व भाष्यकार | | |
| 9) Total Expenditure for the Programme: | | १०००/- | | |
| 10) Source of Funding: | | राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त), लातूर | | |

## B) A Report

i. Title: **'अमूर्त संस्कृती संचित'**

ii. Introduction (with details of name of programme, organizer, date venue

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त) व मराठी विभाग अंतर्गत डॉ. साहेब खंदारे (लोकसाहित्याचे अभ्यासक, संशोधक व भाष्यकार) यांची 'अमूर्त संस्कृती संचित' या विषयावर प्रकट मुलाखत घेण्यात आली. यासाठी मुलाखतकार म्हणून डॉ. संभाजी पाटील, डॉ. गणेश बेळंबे, कवी राजेसाहेब कदम यांना निमंत्रित करण्यात आले होते. यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे होते. उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक डॉ. कांत जाधव यांनी केले, तर आभार डॉ. गणेश बेळंबे यांनी मानले. यावेळी मराठी विभागातील ०६ प्राध्यापक, आणि ४६ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

iii. Objectives of the Programme

१. लोकसाहित्यातील विविध संकल्पना समजून घेणे.

२. लोकसाहित्यातील अमूर्त संकल्पनेची ओळख करून घेणे.

३. अमूर्त संस्कृतीतून शाश्वत विकास कसा घडून येतो ते समजून घेणे.

४. अमूर्त संस्कृती संचित विद्यार्थ्यांच्या मनात रुजविणे.

iv. Details of Participants: पदवी, पदव्युतर ११ मुले + ३५ मुली असे एकूण ४६ विद्यार्थी व ०६ प्राध्यापकांची उपस्थिती होती.

v. Brief Summary of Events/ Session

राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त) मराठी संशोधन केंद्र अंतर्गत डॉ. साहेब खंदारे यांची 'अमूर्त संस्कृती संचित' या विषयावर प्रकट मुलाखत घेण्यात आली. या मुलाखतीसाठी मुलाखतकार डॉ. संभाजी पाटील, डॉ. गणेश बेळंबे, कवी राजेसाहेब कदम यांना निमंत्रित करण्यात आले होते. कार्यक्रमाचे अध्यक्ष महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे होते. उपप्राचार्य प्रा. सदाशिव शिंदे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी विविध प्रश्नांच्या माध्यमातून अमूर्त संस्कृती संचित संकल्पना समजून घेण्याचा प्रयत्न करण्यात आला.

डॉ. गणेश बेळंबे : अमूर्त संस्कृतीची कांही उदाहरणे सांगा ?

डॉ. साहेब खंदारे : जगातील संस्कृती ही शेतीपासून निर्माण झाली आहे. सुरूवातीला ब्रह्म म्हणजे बीज सापडले व भटकंती करणारा माणूस थांबला. त्यावेळेपासून संस्कृती निर्माण झाली. स्वसंरक्षणासाठी झोपड्या निर्माण झाल्या. माणसाच्या गरजा वाढत गेल्या तीसुद्धा एक संस्कृती होय. बायका शेतीची कामे करू लागल्या, त्यासाठी त्यांना शारीरिक उर्जेची गरज भासू लागली. तेव्हा तीच्या आतून गाणं येऊ लागलं. ते अमूर्त आहे.

डॉ. संभाजी पाटील : अमूर्त शाश्वत विकास म्हणजे काय, समजून सांगा ?

डॉ. साहेब खंदारे : अमूर्त शाश्वत विकास घडवून आणण्यासाठी मानवी जीवनात सूक्ष्म बदल होतात. माणसं सारखीच असतात पण त्यांची दु:ख मात्र वेगळे असतात. शहरी भागातील व ग्रामीण भागातील माणसांची दु:ख निवारणाची पद्धतही वेगळी असते. पारंपरिक पद्धतीत चांगले विज्ञान दडलेले आहे. ते ग्रामीण भागात पाहावयास मिळते. शाश्वत विकास हा अमूर्त संस्कृतीतून जात असतो. त्या परंपरेतच विज्ञानाचे सत्य दडलेले असते.

कवी राजेसाहेब कदम : अमूर्त संस्कृती आणि शाश्वत विकास याची सांगड घालता येईल का ?

डॉ. साहेब खंदारे : हो.. नक्कीच शक्य आहे. दोनशे वर्ष जुने किल्ले आजपर्यंत टिकून आहेत; पण सद्या बांधलेले मोठमोठे पूल मात्र सहज ढासाळत आहेत. त्यावेळी त्या किल्याच्या बांधकामासाठी वापरलेली मातीच महत्त्वाची होती. माती निर्मितीतून कोणतेही प्रदूषण झाले नाही. पण सद्या सिमेंट बनवणाऱ्या कारखान्यातून कितीतरी प्रदूषण निर्माण होत आहे. सद्या मोठमोठ्या कार्यक्रमात जेवणासाठी वापरल्या जाणाऱ्या प्लेटस् ह्या प्लॅस्टीकपासून तयार झालेल्या आहेत. त्यामुळे प्रदूषणात भर पडत आहे. खूप जनावरे ते खावून मरत आहेत. त्यामुळे पारंपरिक पत्रावळीचा उपयोग केला तर ही हानी नक्कीच टळू शकते. त्यातून सुद्धा चांगला विकास घडून येवू शकतो.

डॉ. गणेश बेळंबे : मौखिक संस्कृतीतून शाश्वत विकास कसा होईल ?

डॉ. साहेब खंदारे : मौखिक स्वरूपातील प्रेरणादायी कथेतून ऐकणाऱ्या व्यक्तिंना विशिष्ट प्रकारची प्रेरणा मिळत असते. ती कथा ऐकूण त्यांच्या मेंदूतील प्रेरणादायी रस श्रवत असतो. व तो ते कार्य करण्यास तयार होतो. एखादा आनंद निर्माण करणारी कथा ऐकल्यानंतरही त्याला चांगल्या प्रकारचा उत्साह निर्माण होतो.

डॉ. संभाजी पाटील : प्रयोगशील कलेतून शाश्वत विकास कसा होईल ?

डॉ. साहेब खंदारे : मैदानी खेळातून त्या खेळाडूचा शारीरिक विकास होतो. तसेच त्या खेळाडूची एकाग्रता वाढीस लागते. सोबत मनोरंजनही होते. समाजातील काही कला ह्या शारीरिक व्यंग सांगणाऱ्याही आहेत. त्यातून मानवी दोष सहज बाहेर येतात. कलेतून मानवी विकास निश्चित होतो. वारकरी संप्रदायाने महाराष्ट्रातील माणसांची चांगली मशागत केली आहे.

डॉ. गणेश बेळंबे : शाश्वत विकासाचे उत्तरदायित्व कोणाकडे आहे ?

डॉ. साहेब खंदारे : शाश्वत विकासाचे उत्तरदायित्व हे शासन व राजकीय व्यक्तीकडे आहे. त्यांनी ते जपून ठेवणे आवश्यक आहे. तरच शाश्वत विकास होवू शकतो.

अशाप्रकारच्या अनेक प्रश्नातून 'अमूर्त संस्कृती संचित' समजून घेण्याचा प्रयत्न केला आहे. यावेळी मराठी विभागातील ०६ प्राध्यापक आणि ४६ विद्यार्थ्यांची उपस्थिती होती.

vi. Conclusion, with Feedback on the Programme:

उपक्रमाच्या माध्यमातून 'अमूर्त संस्कृती संचित' हे शाश्वत विकासासाठी किती महत्त्वाचे आहे. याचा बोध उपस्थितांना झाला.

Vii. Any Appendix If Necessary: उपस्थितांची यादी सोबत जोडली आहे.

HoD
मराठी विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),
लातूर ४१३ ५१२

Principal
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर
(स्वायत्त)

C) Geo tagged – Not more Than 5 Photos (hard and soft copies to be maintained by the department/ Unit).



कार्यक्रमाचे प्रास्तविक करताना डॉ. कांत जाधव



प्रकट मुलाखतीस शुभेच्छा देताना प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे




प्रकट मुलाखत देताना डॉ. साहेब खंदारे



मुलाखतीस उपस्थित प्राध्यापक व विद्यार्थी

D) Link of Video of the programme if any (Video may be uploaded on college website/ YouTube, etc.) https://youtu.be/hTBOL9WhvK8?feature=shared

E) Copies of Brochure Prepared for the Programme: **कार्यक्रमाचा डिजिटल बॅनर**




F) Any Other Publicity Material (news reports, online publicity, etc.) (Hard and soft copies to be maintained by the department/ Unit).

उपस्थित विद्यार्थ्यांची यादी सोबत जोडली आहे.

HoD
मराठी विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),
लातूर ४१३ ५१२

Principal
प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर
(स्वायत्त)

# राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (स्वायत्त)

प्रकट मुलाखत

**डॉ. साहेब खंदारे**

(लोकसाहित्याचे अभ्यासक, संशोधक व भाष्यकार)

**विषय: अमूर्त संस्कृती संचित**

कार्यक्रमाचे अध्यक्ष : प्राचार्य डॉ. महादेव गव्हाणे, प्रमुख उपस्थिती: उपप्राचार्य प्रा.सदाशिव शिंदे

मुलाखतकार डॉ. संभाजी पाटील, डॉ. गणेश बेळंबे, कवी राजेसाहेब कदम

---

दिनांक १३ सप्टेंबर २०२४, ४.०० वाजता, स्थळ: व्ही. एल. सी. हॉल

---

**उपस्थिती**

| अ. क्र. | उपस्थितांची पूर्ण नावे | पद / वर्ग | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| 01 | डॉ. संभाजी पाटील | प्राध्यापक | [signature] |
| 02 | डॉ. गोविंद उफाडे | सहा. प्राध्यापक | [signature] |
| 03 | डॉ. शिवराज काचे | — " — | [signature] |
| 04 | डॉ. विजयकुमार करजकर | — do — | [signature] |
| 05 | प्रा. अमोल माळी | — | [signature] |
| 06 | डॉ. प्रकाश रोडीया | प्राध्यापक | [signature] |
| 07 | कांबळे विशाल हरिश्चंद्र | M.A.S.Y. in geo | Dkamble |
| 08 | कदके वैभव कैलास | M.A.F.Y. (Eco) | [signature] |
| 09 | सरवदे प्रमोद नागनाथ | M.S.W | [signature] |
| 10 | रासुरे गायत्री बालाजी | M.A.S.Y | [signature] |
| 11 | प्रतिक्षा बळीराम मोरे | M.A.S.Y | [signature] |
| 12 | शिंदे पुनम सतिश | M.A.S.Y. | [signature] |
| 13 | कदम अजय बालाजी | B.Sc.Fy | A. Kadam |
| 14 | कांबळे सुहाना सतिश | B.com Fy | Suhana |
| 15 | घोडके आरती धनंजय | B. Com F Y | Aarti |
| 16 | वाघे प्रांजली मार्तंड | B. com F y | [signature] |
| 17 | उपाडे कन्याका बालासाहेब | B. com Fy | KanyAkA |
| 18 | इरले आकांक्षा श्रीराम | BA. TY | [signature] |
| 19 | राजकन्या फावडे | B A TY | [signature] |
| 20 | गोरे तनुजा | B A TY | [signature] |
| 21 | तांबोळी अफरीन अयुब | B.com I Year | A.Tamboli |
| 22 | मोरे निकिता राम | B.com I year | Nikita |

| अ. क्र. | उपस्थितांची पूर्ण नावे | पद / वर्ग | स्वाक्षरी |
|---|---|---|---|
| 23 | पतंगे भूमिका अमरनाथ | B.com F.y | Bhumika |
| 24 | चतुर्वेदी ऐश्वर्या संतोष | B.Com f.y | Aishwarya |
| 25 | जाधव अश्विनी राजेभाऊ | BA T.Y | Ashvini |
| 26 | आल्टे अंजली महादेव | BA T.Y | Anjali |
| 27 | जानराव सरोजिनी राजेंद्र | BA TY | Sarojini |
| 28 | कुंभार दिव्या अरुण | B.com.f.y | D.Kumbhar. |
| 29 | तांबोळी इरम सलीम | B.Com F.Y. | Iram |
| 30 | चोपडे महादेवी रामदास | B.A SY | Mahadevi |
| 31 | शेख फिरदोस इलाही | BSC 1 yr | [signature] |
| 32 | मासुलदार सना हुसेन | BSC F.y | [signature] |
| 33 | बनसोडे नेहा सतिश | BA SY | Neha |
| 34 | कांबळे अर्पिता राम | BA SY | Arpita |
| 35 | जाधव प्रिती परमेश्वर | BASY | Priti. |
| 36 | सिद्दिकी सादिया युनुस | BASY | Sadiya. |
| 37 | जागडे भाग्यश्री उत्तम | BASY | Bhagyshri. |
| 38 | सुरवसे दिक्षा भास्कर | B.A. SY | Diksha. |
| 39 | शेख महेक युनुस | B.A.fy | [signature] |
| 40 | शेख मुस्कान युनुस | B.A.f.y | Muskan |
| 41 | इथके समा धनराज | B.com.f.y | Sama |
| 42 | जाधव स्नेहा ज्ञानोबा | B.com.fy | Sneha |
| 43 | केंद्रे ज्ञानेश्वरी हर्षु | B.com.S.y | [signature] |
| 44 | मोरे भाग्यश्री बन्सी | B.com II.y | Bhagyashri |
| 45 | बाबळगुरे स्नेहा धनराज | B.com II.y | Sneha |
| 46 | कांबळे अमित मधुकर | B.SC Fy | Amit |
| 47 | सावंत धनराज विठ्ठल | B.SC FY | [signature] |
| 48 | बनसोडे मयुर रूपेश | BA.SY (CEP) | Mayur |
| 49 | गोरड कृष्णा बापुराव | — | KRISHNA |
| 50 | शिंदे ओम अशोक | बी.ए. द्वितीय वर्ष | [signature] |
| 51 | जमादार देवराज राजकुमार | बी.ए.सि.इ.पी | [signature] |
| 52 | जमादार निसमशिनराजकुमार | BA (CEP) SY | [signature] |

मराठी विभागप्रमुख

मराठी विभागप्रमुख
राजर्षी शाहू महाविद्यालय (स्वायत्त),
लातूर ४१३ ५१२

प्राचार्य

प्राचार्य
राजर्षी शाहू महाविद्यालय,लातूर
(स्वायत्त)